# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## गौण खनिज विभाग

---

### जाहिर प्रगटन

**रेती लिलाव 2011-2012 जाहिर लिलाव नविन वाळू घाट (प्रथम फेरी ) नि-निविदा आणि दिनांक 03/11/2011 रोजी अंतिम न झालेले वाळू घाटांचे फेरलिलाव (दुसरी फेरी)**

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, शासन निर्णय गौखनि10/0208/प्र.क्र. 32/ख दिनांक 25/10/2010 मधील तरतुदीनुसार व मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्र. 2011/मशाका/2/कावि 62 दिनांक 22/11/2011 अन्वये मंजुरी दिल्यानुसार सन 2011-2012 करीता नविन एकुण 14 वाळू घाटांचे प्रथम फेरी आणि पत्र क्र. 2011/मशाका/2/कावि 62 दिनांक 29/09/2011 अन्वये मंजुरी दिल्यानुसार दिनांक 03/11/2011 रोजी अंतिम न झालेले एकुण 60 वाळू घाटांचे फेरलिलाव (दुसरी फेरी) दिनांक 31 जुलै,2012 अखेर पर्यंतच्या मुदतीसाठी लातूर जिल्हयातील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, लातूर यांनी प्रमाणित केलेल्या तसेच ग्रामसभेचे नाहारकत ठराव प्राप्त झालेल्या वाळू घाटाच्या प्रथम फेरीचा लिलाव जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे **दिनांक 07/12/2011 रोजी सकाळी 11.00 वाजता** घेण्यात येणार आहे. सदर लिलाव प्रक्रियेमध्ये जाहिर बोली व बंद निविदा या पध्दतीचा एकाच वेळी अवलंब करण्यात येणार आहे. लिलाव जाहिर बोलीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर त्याच ठिकाणी संबधित बंद निविदा उघडण्यात येतील.वाळू घाटाची उच्चतम बोली लिलाव व बंद निविदा यामध्ये जी रक्कम जास्त असेल त्यास लिलाव अंतिम करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **1. लिलावाची तारीख** | : | **दिनांक07/12/2011.** |
| **2. लिलाव स्थळ** | : | **जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर.** |
| **3. निविदा किंमत** | : | **रुपये 2000/- प्रत्येक वाळू घाटासाठी वेगवेगळी (विना परतावा)** |
| **4. निविदा वाटपाचा व स्विकारण्याचा कालावधी व ठिकाण** | : | **दिनांक 23/11/2011 ते दिनांक06/12/2011 पर्यंत (कार्यालयीन वेळेत, सुटीचे दिवस वगळून) गौण खनिज शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर.** |

5. काळया यादीमध्ये नाव असणा-या व्यक्तीस लिलावात भाग घेता येणार नाही.
6. ज्या इसमांना लिलावात बोली बोलावयाची आहे त्यांनी स्वतः सदरील तारखेस व वेळेवरउपस्थित राहून लिलावात भाग घ्यावा.
7. लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व निविदा भरु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्ती /संस्थेकडेआयकर विभागाचे पॅनकार्ड असणे बंधनकारक असून मागील वर्षी दाखल केलेल्या रिटर्नची प्रत दाखल करावी लागेल व त्या व्यक्ती / संस्थेने विक्रीकर विभागाकडील टीन (TIN) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ज्यांच्याकडे पॅनकार्ड व टीन (TIN) प्रमाणपत्र नसेल अशांना लिलावात भाग घेता येणार नाही.
8. लिलाव स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे तसेच लिलावाचे जाहिर प्रगटनामध्ये कोणताही बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.
9. लिलावात भाग घेण्यासाठी व्याक्तीला / संस्थेला निश्चित करण्यात आलेल्या सरकारी किंमतीच्या 1/4 रक्कम जमा करावी लागेल. त्यानंतर लिलावात भाग घेण्याची परवानगी दिली जाईल.
10. सदर लिलावाच्या विस्तृत स्वरुपात सदरील अटी व शर्ती आणि प्रथम फेरीतील नविन (14) वाळूघाट , दिनांक 03/11/2011 रोजी अंतिम न झालेले (60)वाळू घाटांचे फेरलिलाव (दुसरी फेरी) असे एकुण 74 वाळू घाटांची माहीती www.latur.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच गौण खनिज विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय,लातूर, उपविभागीय अधिकारी, लातूर /उदगीर/निलंगा तसेच जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध राहतील.

सदरील लिलावातील वाळू घाटांचा तपशील सोबतच्या विवरणपत्रा प्रमाणे आंहे.

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी, लातूर**

---

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## गौण खनिज विभाग

---

**लातूर जिल्हयातील सन 2011-2012 करीता लिलावा करावयाचे वाळूघाटाचे जमा करावयाची अनामत रक्कम रुपये**

| अक्र | वाळू घाटाचे नाव | नदीपात्राचे नाव | अंदाजित वाळूसाठा (ब्रास मध्ये) | वाळू घाटाची अपसेट प्राईस (सरकारी किंमत) | लिलावात भाग घेण्यासाठी भरणा करावयाची रक्कम सरकारी किंमतीच्या 1/4 रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

**वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - लातूर**

**प्रथम फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | भातखेडा | मांजरा | 50 | 190000 | **47500** |
| 2 | पेठ | तावरजा | 350 | 70000 | **17500** |
| 3 | रमजानपूर | मांजरा | 200 | 40000 | **10000** |
| 4 | कासारखेडा | मांजरा | 250 | 50000 | **12500** |
| 5 | टाकळगाव | मांजरा | 250 | 50000 | **12500** |
| 6 | बामणी | जाना नदी | 100 | 20000 | **5000** |
| 7 | धनेगाव | मांजरा | 450 | 159000 | **39750** |
| 8 | कव्हा | तावरजा | 500 | 100000 | **25000** |
| 9 | चांडेश्वर | तावरजा | 400 | 80000 | **20000** |
| 10 | टाकळी (2) | मांजरा | 795 | 580750 | **145188** |

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | महापुर | मांजरा | 1414 | 394047 | **98512** |
| 12 | भातांगळी | मांजरा/रेणा | 100 | 265200 | **66300** |
| 13 | टाकळी | मांजरा | 6353 | 4345706 | **1086427** |
| 14 | सलगरा | मांजरा | 130 | 242700 | **60675** |
| 15 | बिंदगीहाळ | मांजरा | 2544 | 508800 | **127200** |
| 16 | शिवणी खु. | मांजरा/तावरजा | 848 | 247621 | **61905** |
| 17 | साई | मांजरा | 1414 | 402500 | **100625** |
| 18 | बोडखा | मांजरा | 841 | 207000 | **51750** |
| 19 | सारसा | मांजरा | 780 | 190900 | **47725** |
| 20 | वांजरखेडा | मांजरा | 975 | 246506 | **61627** |
| 21 | भाडगांव | मांजरा | 100 | 104650 | **26163** |
| 22 | जेवळी | मांजरा | 750 | 149500 | **37375** |
| 23 | चिकलठाणा | मांजरा | 200 | 159200 | **39800** |

---

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## गौण खनिज विभाग

---

### वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - औसा

**प्रथम फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बोरगाव | नागझरी | 300 | 60000 | **15000** |

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | काळमाथा | तेरणा | 1060 | 275792 | **68948** |
| 3 | हिप्पसोगा | तावरजा | 1060 | 264002 | **66001** |
| 4 | बुघोडा | तावरजा | 790 | 158000 | **39500** |
| 5 | धानोरा | तावरजा | 500 | 100000 | **25000** |
| 6 | उजनी | तेरणा | 1325 | 265000 | **66250** |
| 7 | शिवणी बु. | मांजरा/तेरणा | 1325 | 284400 | **71100** |
| 8 | होळी | मांजरा | 800 | 405400 | **101350** |
| 9 | भुसणी | तावरजा | 740 | 522600 | **130650** |
| 10 | अलमला | तावरजा | 1450 | 265970 | **66493** |

### वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - रेणापूर

**प्रथम फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोहरेगाव | मांजरा | 100 | 20000 | **5000** |

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | इंदरठाणा | मांजरा | 618 | 159090 | **39773** |
| 3 | सांगवी | मांजरा | 1766 | 959992 | **239998** |
| 4 | आंदलगांव | मांजरा | 1413 | 408279 | **102070** |
| 5 | वांगदरी | मांजरा | 3000 | 1354324 | **338581** |
| 6 | आरजखेडा | मांजरा | 5300 | 1454837 | **363709** |
| 7 | डिगोळ देशमुख | मांजरा | 1766 | 514283 | **128571** |
| 8 | डिगोळ देशपांडे | मांजरा | 927 | 269249 | **67312** |

### वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - निलंगा

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | होसूर | मांजरा | 70 | 874000 | **218500** |
| 2 | गिरकचाळ | मांजरा | 125 | 88400 | **22100** |
| 3 | गौर | मांजरा | 100 | 207000 | **51750** |
| 4 | बसपुर | मांजरा | 450 | 198000 | **49500** |
| 5 | तगरखेडा | तेरणा | 1590 | 318200 | **79550** |
| 6 | वांजरवाडा (शि) | मांजरा | 1200 | 371200 | **92800** |
| 7 | शिवूर (1) | मांजरा | 8833 | 3897818 | **974455** |
| 8 | शिवूर (2) | मांजरा | 10600 | 2120000 | **530000** |
| 9 | सोनखेड | तेरणा | 1600 | 320000 | **80000** |

---

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## गौण खनिज विभाग

---

**वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - शिरुर अनंतपाळ**

**प्रथम फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | राणी अंकुलगा | मांजरा | 500 | 100000 | **25000** |
| 2 | हालकी | मांजरा | 800 | 160000 | **40000** |

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | साकोळ | घरणी | 1060 | 262002 | **65501** |
| 4 | वांजरखेडा | मांजरा | 1760 | 373400 | **93350** |
| 5 | हिसामाबाद | मांजरा | 1060 | 212000 | **53000** |
| 6 | डोंगरगांव | मांजरा | 1414 | 507150 | **126788** |
| 7 | बिबराळ | मांजरा | 1325 | 310366 | **77592** |
| 8 | फकरणपुर | मांजरा | 2400 | 1552500 | **388125** |
| 9 | बाकली | मांजरा | 530 | 160395 | **40099** |

**वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - उदगीर**

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | गुडसूर (1) | तेरु नदी | 140 | 110400 | **27600** |
| 2 | गुडसूर (2) | तेरु नदी | 200 | 40000 | **10000** |
| 3 | गुडसूर (3) | तेरु नदी | 200 | 40000 | **10000** |
| 4 | डांगेवाडी (1) | तेरु नदी | 260 | 362600 | **90650** |
| 5 | डांगेवाडी (2) | तेरु नदी | 350 | 70000 | **17500** |
| 6 | डांगेवाडी (3) | तेरु नदी | 630 | 126000 | **31500** |
| 7 | डांगेवाडी (4) | तेरु नदी | 800 | 160000 | **40000** |

**वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - देवणी**

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सिंधीकामठ | मांजरा | 350 | 141400 | **35350** |
| 2 | गौडगांव | मांजरा | 350 | 70800 | **17700** |
| 3 | लासोना | मांजरा | 350 | 159200 | **39800** |
| 4 | टाकळी बु. | मांजरा | 350 | 282800 | **70700** |
| 5 | जवळगा | मांजरा | 700 | 321600 | **80400** |
| 6 | हिसामनगर | मांजरा | 500 | 100000 | **25000** |

**वाळू लिलाव सन 2011-2012 तालुका - चाकूर**

**दुसरी फेरी**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | घरणी | ओढा | 300 | 60000 | **15000** |
| 2 | वडगाव (ए) | ओढा | 300 | 60000 | **15000** |

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी लातूर**

---

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## गौण खनिज विभाग

---

**लातूर जिल्हयातील रेती / वाळू लिलाव सन 2011-2012 जाहिर लिलाव नविन वाळू घाट (प्रथम फेरी ) नि-निविदा आणि दिनांक 03/11/2011 रोजी अंतिम न झालेले वाळू घाटांचे फेरलिलाव (दुसरी फेरी) दिनांक 07/12/2011**

**अटी व शर्ती**

**1)** वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने लिलावाला सुरूवात करण्यात येईल.

**2)** लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा तसेच निविदाव्दारे प्राप्त झालेले देकार हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास मा.विभागीय आयुक्त यांचे निर्देशास अनुसरून त्या वाळू गटाचा 15 दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

**3) लिलावात भाग घेवू ईच्छीना-या व निविदा भरु ईच्छीना-या प्रत्येक व्यक्ती / संस्थे कडे आयकर विभागाचे पॅनकार्ड असने बंधन कारक असून मागील वर्षी दाखल केलेल्या रीटर्न ची प्रत दाखल करावी लागेल व त्या व्यक्ती/ संस्थेने विक्रीकर विभागाकडील टीन (TIN) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. ज्यांच्याकडे पॅनकार्ड व टीन (TIN) प्रमाणपत्र नसेल अशांना लिलावात भाग घेता येणार नाही.** .लिलावात भाग व्यक्तीला/सेस्थेस अनामत म्हणून लिलावच्या सरकारी किंमतीच्या 25 टक्के इतकी रक्कम लिलाव सुरु होण्याच्या अगोदर रोखीने संबधित तहसिलदार यांचे कडे भरणा करण्यात यावी लागेल तसेच निविदाचा अर्ज सादर करताना जिल्हाधिकारी कार्यालयात 1/4 रकमेच्या धनाकर्षाद्वारे (केवळ राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष जिल्हाधिकारी लातूर यांचे नांवे काढलेला असावा)भरावी लागेल.ज्या बोलीदाराची अत्युच्य बोली/निविदा स्विकारण्यात येईल, त्याची रक्कम नियमानुसार त्याने भरावयाच्या बोलीच्या1/4 इतक्या सुरक्षितता रक्कमेत समायोजीत करण्यात येईल. ज्या बोलीदाराची बोली/निविदा स्विकारण्यात येणार नाही त्यांची अनामत रक्कमा लिलाव संपल्यानंतर लिलावाच्या ठिकाणीच रोखीने परत करण्यात येतील..

**4)** लिलावाने घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किवा नाही. वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेण्याची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील.

**5)** ज्या बोलीदाराची बोली/निविदा स्विकारण्यात येईल त्याला त्याने दिलेल्या बोलीच्या रकमेच्या 1/4 इतकी रक्कम लिलाव संपताच विहित मुदतीत प्रकरण परतत्वे जिल्हाधिकारी कार्यालयात भरावी लागेल.

**6)** लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोलीचा देकार स्वीकारावयाचा किंवा नाकारावयाचा निर्णय जिल्हाधिकारी घेतील व सदर निर्णय संबंधीतास लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल.

**7)** लिलावातील/ निविदेतील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर व 1/4 रक्कम भरल्यानंतर 15 दिवसात बोलीची उर्वरीत रक्कम भरण्यात येईल अशा हमीचे दायीत्व स्वीकारणा-या दोन व्यक्तीसह लिलाव धारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रूपये 100/- ईतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा/शपथपत्र करून देईल. असे करारनामा/शपथपत्र करून न दिल्यास त्याने भरलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती/वाळू गटाचा फेर लिलाव करण्यात येईल तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणा-या कोणत्याही नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावच्या बोलीतील रकमे पैकी अ.क्र.5 प्रमाणे भरलेली रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली 75% रक्कम सर्वोच्च बोली स्विकारल्यापासुन 15 दिवसात एक रक्कमी भरावी लागेल.लिलाव धारकाने शिल्लक राहीलेली 75% रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर, त्याला वाळू स्थळाचा प्रत्यक्ष ताबा उशिरात उशिरा 7 दिवसात देण्यात येईल.

**8)** रेती/वाळू (ठेका) लिलाव ज्यावेळी रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती वाळू क्षेत्राचा नव्याने लिलाव करण्यात येईल. फेर लिलावात पुर्वीच्या लिलावाच्या किंमती पैक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या लिलावधारकाकडुन जमीन महसुलांची थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल. तथापी फेरलिलावात पुर्वीच्या किमंती पेक्षा अधीक (जादा) किमत आल्यास त्यावर पुर्वीच्या लिलाव धारकास कोणताही हक्क रहाणार नाही.

---

**9)** लिलावधारक, त्याच्या लिलावक्षेत्रातील ज्या ठिकाणावरुन रेती/वाळू काढण्याने धुप होउ शकेल व त्यामुळे निवासी ईमारतीना घरे अथवा इतर बांधकामे याना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वतः उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिका-याचे निर्णय अंतिम असतील.

**10)** विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातील रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही तसेच  इतर व्यक्तीच्या खाजगी मालकीच्या जमीनीतुन अशा जमीनी लिलावाने देण्यात आलेल्याक्षेत्रात असल्यातरी रेती/वाळू काढता येणार नाही. तसेच रस्ते /पायवाट म्हणुन वापरण्यात येणा-या जमीनीतुन रेती/वाळू काढता येणार नाही.

**11)** जिल्हाधिका-याला खाडी पात्रातील नौकानयन मार्गातील अडथळे दुर करणे तसेच जल-जीवन व जलसंपत्तीच्या हिताच्य दृष्टिने खाडी क्षेत्रातील रेती उत्खननासाठी ड्रेझर्सचा वापर करणा-यावर उचित बंधने घालता येतील.

**12)** कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजुने 600 मीटर (2000 फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी-नाल्यावर पुल आहेत,त्यांच्या स्तंभा पासुन 100 मीटरस पर्यंत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

**13)** जेथे वाळू उत्खनन चालू आहे त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सीमा निश्‍चित करुन दर्शविण्यात यांवी .

**14)** वाळूचे/रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी/नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायीत्व लिलावधारकावर राहील.अशा हानीची/ नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडुन करण्यात येईल व त्या बाबतचा त्यांचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसुलाच्या वसुली प्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

**15)** लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती/वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. परंतु लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावाधीसाठी,त्याने ज्या किंमतीला लिलाव घेतला त्या रकमेच्या प्रमाणात त्याला परतावा देण्यात येईल.अशी रक्कम परत करताना लिलावाची देकाराची रक्कम लिलावातील अंदाजीत वाळू साठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळसाठा विचारात घेवून त्या नुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

**16)** उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळूची/रेतीची साठवणुक,लिलाव ज्या जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे. त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर दहा दिवसात उत्खननाच्या जागेवरून हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळूच्या/रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरूध्द दावा करता येणार नाही.

**17)** लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या/रेतीच्या वाहतुकीसाठी आवश्याक परवाने /पासेस पुस्तके लिलावधारकाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन उपलब्ध करून देण्यात येतील. असे पासेस उपलब्ध करुन देतांना लिलावधारकास वाळू घाटात उपलब्ध असलेला अंदाजीत वाळूसाठा व उत्खनन विचारात घेवून आवश्यक तेवढेच पासेस पुस्तके लिलावधारकास देण्यात येतील. वैध परवाने/पासेस धारण करणा-यांनाच वाळू/रेतीची वाहतूक करता येईल.

**18)** लिलावधारकास वाळूची/रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थाना प्राधान्य दिले पाहिजे

**19)** लिलावधारकाने जिल्हा परिषद कर/पंचायतकर विहित केल्याप्रमाणे अदा करण्यात यावा.

**20)** प्रत्येक वाहतूक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील.सर्व जिल्हयात याच पध्दतीने वाहतूक पावती देणे बंधनकारक राहील.लिलावाची पुर्ण रक्कम भरल्या नंतर वाळू साठयाइतके उत्खनन करण्याचा कायदेशिर अधिकार लिलावधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजे वाळू साठयाइतके च उत्खनन वाहतूक परवाने लिलावधारकास देण्यात येतील..

**21)** लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्रधिका-यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नांव पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

**22)** लिलावाद्वारे/निविदाद्वारे विक्री केलेल्या स्थळाचा किंवा रेती / वाळू ठेक्याचा कालावधी **दिनांक 31.7.2012** पर्यतच राहील.लिलावाने दिलेल्या क्षेत्रातुन करारात नमुद केलेल्या कालावधीत,परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे/रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही,रस्ते उपलब्ध नाहीत,वाळू स्थळात पाणी आहे. अशा तसेच मानवी व नैसर्गीक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवुन दिला जाणार नाही व वाळू घाट बदलून दिला जाणार नाही.

**23)** उत्खनन केलेल्या वाळू/रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करून दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवुन दिला जाणार नाही अथवा रेती /वाळूघाट बदलुन दिला जाणार नाही.

**24)** नदीपत्रातील/नाल्यातून अथवा त्याला रेती/वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातुन रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गीक संपत्तीस व पर्यवरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

**25)** रेतीचे/वाळूचे नदीपात्रातून/ नाल्यातून पाच फुट किंवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणनेने सर्वेक्षणानंतर विहीत केलेल्या खोलीपैक्षा ज्यास्त उत्खनन करण्यात येवु नये. तसेच नदीपत्र/ नाला त्याचे पात्र बदलुन अथवा त्यांना हानी पोचवुन पर्यवरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावायची आहे.

**26)** लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कास बाधा पोहोचविता कामा नये.

**27)** रेती/वाळू उत्खनन करताना अथवा हलविताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

**28)** लिलावधारकाने रेतीच्या/वाळूच्या वाहतूकीसाठी सक्षम प्राधिका-याने म्हणजे जिल्हा खनिकर्म अधिका-याने प्रमाणित व स्वाक्षरित केलेले वाहतूक पावती वाळू/रेतीची वाहतूक करणा-या प्रत्येक वहानासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती/वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्या परिमाणाची वाहतूक पावती दयावी. कोणतेही वाहन त्यापेक्षा अधिक परिमाणाची रेती/वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपुर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटारवाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडात्मक कारवाई करण्यात येईल. दंडनीय कार्यवाही नंतर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेती बाबतची दैनंदिनी हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी,खनिकर्म निरिक्षक, महसुल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयतील निरिक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करून द्यावीत

**29)** गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबधातील सर्व हिशेब व कागदपत्रे लिलावाने / परवानाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदरहू हिशेब व कागदपत्रे संबधीत महसूल अधिकारी खनिकर्म अधिकारी तसेच

भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र राज्य नागपुर यांच्या अधिपत्याखालील अधिका-यांच्या निरिक्षणाकरीता उपलब्ध करुन दयावी.

**30**) लिलावधारकाने कररानामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ कमीत कमी रूपये 10,000/-(रूपये दहाहजार फक्त) किंवा अपसेट पाईसच्या तीन टक्के या पैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडे ठेवणे आवश्यक आहे. ही रक्कम लिलावधारकाने लिलावाचे मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्य रित्या पालन केल्यास लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल.

**31)** लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतूदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

**32)** रेताचे/वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळुन आल्यास लिलावधारकाने/ ठेकेदाराने सक्षम प्राधिका-यास सात दिवसात कळविले पाहिजे.

**33**) खाडी पत्रात ड्रेझद्वारे रेती उत्खनन करणा-या ड्रेझरधारकाने पर्यापरण विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेस अनुसरुन ड्रेझर्ससाठी परवानगी घेतांना सर्व सर्व ड्रेझर्सची यादी एकत्रीपणे पर्यावरण विभागास सादर करावी. पर्यावारण विभागाने नाहरकत प्रमाणपत्राबाबत 15 दिवसात निर्णय घेणे अनिवार्य आहे. तसा निर्णय न घेतल्यास संबधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल.तसेच लिलावधारक /परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमाच्या तरतूदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

**34**) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाट बंधारे विभाग /विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्याक आहे.

**35**)सार्वजनिक पाणवठा/पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणा पासुन 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरा पलीकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

**36**) वाळूची वाहतूक करताना वाहनातील वाळू प्लास्टीक पेपरने /ताडपत्रीने आच्छादितकरूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे.

**37**)अंदाजीत परीमाणापेक्षा अधिक उत्खनन लिलावधारकास करता येणार नाही.परिमाणापेक्षा जास्त उत्खनन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

**38**)अवैध वाळू/रेती साठा पकडल्या नंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 48(7)व (8)नुसार कारवाई करण्यात येईल

**39**)विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी शासकीय /निमशासकीय, स्वायत्त संस्था व सहकारी संस्था यांना कोणत्याही कामासाठी वाळू / रेती गट राखीव ठेवू नये तसेच कोणत्याही प्रकारचा परवाना देण्यात येऊ नये अपवादात्मक परिस्थितीत वाळू गट राखुन ठेवणे किंवा परवाना दयावयाचा झाल्यास असा प्रस्ताव राज्य शासनास पाठवावा व त्यावर राज्य शासन निर्णय घेईल.

**40**)ज्या व्यक्तीचा उच्चतम देकार स्विकारण्यात येईल,त्याला संबधीत रेती/वाळू घाटाचे सर्वेक्षण महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने केले असल्यास महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड निश्चित करेल इतक्या रकमेचा महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे नावाने काढलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणे कडून सर्वेक्षण करण्यात आले असल्यास रु.5000/-(अक्षरी रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेचा संचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या नावाने

काढलेला धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) सर्वेक्षण शुल्कापोटी लिलावाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावा लागेल.

**41) महाराष्ट्र शासनाचे आयकर विभागातील शासन निर्णयामधील वेळोवेळी निघालेल्या सुचना / निर्देशानुसार लिलाव रक्कमेवर आयकर लागु होत असल्यास ते भरणा करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील. प्रत्येक लिलाव कायम झाल्यावर त्या लिलावधारकास आयकराचे चलान जिल्हाधिकारी कार्यालयातून देण्यात येईल त्याचा भरणा लिलावधारकास स्वतः करावा लागेल. असे चलन भरणा करणे सर्व लिलावधारकावर बंधनकारक असून ते भरणा न केल्यास लिलावधारकास पुढील कोणतीही परवानगी मिळणार नाही. त्याने भरणा केलेली 1/4 रक्कम जप्त करण्यात येवून वाळू घाटाचा फेर लिलाव करण्यात येईल.**

**42)** महाराष्ट्र शासनाचे विक्रीकर विभागातील शासननिर्णयामधील वेळोवेळी निघालेल्या सुचना / निर्देशा नुसार लिलाव रकमेवर/ वाळू **विक्रीवर** (जे लागू होंईल त्यावर) विक्रीकर लागु होत असल्यास ते भरणा करणे लिलावधारकावर बंधनकारक राहील.

**43)** लिलावधारकांने 3/4 रक्कम व अनामत रक्कम नियमाप्रमाणे वेळेत भरणा करुन घेवून वाळू घाटाचा ताबा घेण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. लिलावधारकाने वेळेत वाळू घाटाचा ताबा न घेतल्यास त्यामुळे उद्‌भवणा-या तांत्रीक बाबी बाबत लिलावधारक स्वतः जबाबदार राहील.अशा प्रकरणी वाळू घाटाची जागा बदलून मिळणार नाही वा वाळू लिलाव कालावधी वाढवून मिळणार नाही.

**44)**लिलावधारकाने त्याला नेमुन दिलेल्या जागेतून उत्खनन केलेल्या वाळूचे/रेतीचे परिमाण व वाळू/रेतीची खरेदी करणा-याचे नांव व पत्ता दर्शविणारे मासिक विवरणपत्र प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेस सक्षम प्राधिका-यास सादर करावे

**45**) सक्षम प्राधिका-याच्या पुर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही. किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

**46)** पर्यावरण विभाग जे काही नियम लागु करील त्या प्रमाणेच वाळूचे उत्खनन करण्यास परवानगी असेल तसेच पर्यावरण विभागाच्या सर्व अटी शर्तीचे पालन करणे लिलाव धारकावर बंधन कारक असेल.

**47)** रेती / वाळू निर्गती बाबत अथवा त्या अनुषंगाने यापुर्वी निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णय,शासन ज्ञापन, शासन परिपत्रक अथवा शासन पत्रान्वये देण्यात आलेले आदेश, सुचना तरतुदी या शासन निर्णयातील ज्या तरतुदीशी विसंगत अशा प्रकरणी या शासन निर्णयातील तरतुदी अंतीम समजून त्या नुसार कार्यवाही / अंमलबजावणी करण्यात येईल.

दिनांक 23/11/2011

स्वाक्षरीत/-
**जिल्हाधिकारी,लातूर**